# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २०१९
वर्ष ३९, अंक ९



## अध्यक्षीय

**जयजय जी गणनाथा । तूं विद्यावैभवें समर्था ।**
**अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ॥**
**श्रीमत् दासबोध ४-१-१**

नमस्कार मंडळी,

लोकमान्य टिळकांच्या पवित्र स्मृतीला चित्तात धारण करून १ ऑगस्टला मंडळाच्या कार्याची सूत्रे हातात घेतली! सर्वच सहकाऱ्यांचा उत्साह व कामाचा उरक बघता, आपण एका महाचळवळीचा भाग आहोत ही भावना अधिकच दृढ झाली. सर्व समविचारी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन अनेक नवीन कल्पना आणि नूतन प्रकल्प हातात घेण्याचा निश्चय केला. सन २०२०ला बृहन्महाराष्ट्र मंडळाला (बृ. म. मंडळाला) ४० वर्षे पूर्ण होत आहेत, तेव्हा मंडळाला अधिकच गतिमान करण्याच्या दृष्टीने काही ठोस पावले उचलण्याचा निश्चय यापुढील उपक्रमांद्वारे आपल्यासमोर मांडताना, मला आपल्या पाठिंब्याची खात्री आहे.

आमच्या पहिल्याच उपक्रमात बृ. म. मंडळाच्या मराठी शाळेचा अभ्यासक्रम व शाळेचे वर्ग online करण्याचा निर्णय घेण्यात आला. यद्वारे उच्च माध्यमिक शाळेच्या (High School) विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे जरी मराठी शाळेच्या वेळात उपस्थिती जमत नसेल, तरी त्यांना online शाळेतून अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. अधिक माहितीसाठी संकेतस्थळ: BMM Marathi Online Shala

पुढच्या पिढीला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या प्रवाहात सामील करून घेण्यासाठी काही उपक्रम आम्ही आयोजित करत आहोत.

भारतात आणि उत्तर अमेरिकेत उगम पावणाऱ्या लक्षणीय अशा अनेकविध कार्यक्रमांना व्यासपीठ मिळवून देण्याचं कामही पुढे नेत आहोत. १८ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर २०१९ या दरम्यान भारतीय कलाकारांचा कार्यक्रम आखण्यात येत असून कलाकारांच्या व्हिसासाठी प्रक्रिया सध्या सुरू आहे. लवकरच शुभ समाचार अपेक्षित आहे. याशिवाय, आमच्या कार्यकारिणीने हाती घेतलेल्या सर्व उपक्रमांबद्दल सविस्तर माहिती या अंकात पान ५ व पान ६ वर आहे. ती जरूर वाचावी.

सध्या महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे भयंकर पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे, हे आपल्याला विदित असेलच. त्यामुळे आपले कर्तव्यच म्हणून मदतीसाठी बृ.म.मंडळ हे ‘सेवा इंटरनॅशनल’ आणि ‘महाराष्ट्र फौंडेशन’ यांच्यासह आपल्या बांधवांसाठी पुढे सरसावले आहेत. यांस शक्य ते सर्व सहकार्य करावें असे मी आपल्या सर्वांना कळकळीचे आवाहन करते आहे. अधिक माहितीकरिता कृपया कार्यकारिणीशी थेट संपर्क साधावा.

उत्तर अमेरिकेतीलच नव्हे तर जगभरातील मराठी मंडळांना एकत्र आणण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेतच. आपल्या अधिवेशनाला अनेक देशांमधून मराठी बांधव येतात. युरोपातील मराठी बांधवांचे द्विवार्षिक संमेलन फ्रँकफर्ट, जर्मनी येथे १७ ते १९ जुलै २०२०मध्ये संपन्न होणार आहे. त्याची माहिती https://www.ems2020.de/content/home या संकेतस्थळावर आहे. या अधिवेशनाच्या संयोजकांतर्फे आपणां सर्वांना आग्रहाचे आमंत्रण!

२०२१मध्ये शार्लट येथे होणाऱ्या बृ. म. मंडळाच्या अधिवेशनाची तयारी खूपच धडाक्यात सुरू झाली आहे. शुभारंभाच्या सभेत सुमारे २००हून अधिक स्वयंसेवकांनी उपस्थिती नोंदवून, विविध समित्यांद्वारे कामांची विभागणी केली. या उत्साही मंडळींचे कौतुक करावें तेवढे थोडे आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचं मुखपत्र असलेलं बृहन्महाराष्ट्र वृत्त हे आपल्या सर्वांच्या संवादाचे माध्यम आहे. महत्त्वाचे म्हणजे हे वृत्त उत्तर अमेरिकेतल्या प्रत्येक मराठी-भाषकांपर्यंत पोहोचलं पाहिजे, अशी आमची इच्छा आहे. आपल्या सर्व सभासदांना ते आकाशपत्राद्वारे पाठवण्यासाठी आम्ही आग्रही असू. त्याचप्रमाणे आपल्या मंडळात होणारे लक्षणीय कार्यक्रम, उल्लेखनीय घटना, व्यक्ती, इत्यादी माहिती, आणि साहित्य बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या संपादिका सौ. विनता कुलकर्णी (vinata@gmail.com) यांच्याकडे जरूर पाठवा. आम्ही ते प्रकाशित करण्याचा जरूर प्रयत्न करू.

मंडळी, तुम्ही आता सर्वजण घरोघरी गणरायाच्या स्वागताच्या तयारीला लागले असणार! आपणां सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा. आपल्या सर्वांचे संकल्प सिध्दीस जावोत ही श्रीगजाननचरणीं प्रार्थना.

गणपतीबाप्पा मोरया!

**सौ. विद्या रवींद्र जोशी**
अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

### बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

### स्थापना 1981 (शिकागो)

**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**

Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**

Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातींचे दर**

संपर्क: newsletter@bmmonline.org
brihanmm@gmail.com

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२१)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, अॅरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | अॅटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त/मताधिकार नसलेले सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष:** राहुल कर्णिक, डॅलस, टेक्सास

**सदस्य:** मोहित चिटणीस, सिअॅटल, वॉशिंग्टन
नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

...

**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**

vinata@gmail.com or newsletter@bmmonline.org
3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503

## या अंकात...

बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी २०१९-२१- परिचय आणि कार्यकारिणीचे आगामी उपक्रम ३-५
जाणिजे यज्ञकर्म... ६
वारी ७-८
‘नृपो’ची रौप्यमहोत्सवी वाटचाल ९
माहेरची बाग १०
व्यक्तिवेध: डिजिटल मार्केटिंग सल्लागार, लेखक आणि वक्ता: मकरंद उत्पात ११
Business Advertisements

## पुरवणी- ई विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

**- A Financial Checklist You Can handle: Smita Samant** (Solon, Ohio)

**- राशिभविष्य: सप्टेंबर, २०१९** - दादा दामले (न्यू जर्सी)

वाचण्यासाठी संकेतस्थळ:
**http://bmmonline.org/vrutta-esahitya**

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

* VISITORS
* H-1 B VISA HOLDERS
* PERMANENT RESIDENTS
( Some restrictions apply)

**For more information:
Contact: Padmaja Bapat
Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court
Martinez, GA 30907**
Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**

# बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी (२०१९-२१): परिचय

**अध्यक्षा: विदया जोशी - (शिकागो, इलिनॉय)**



- होमिओपॅथिक डॉक्टर, MBA with Healthcareचे उच्च शिक्षण. Advocate Medical Center मध्ये सध्या हेल्थकेअर प्रॅक्टिस मॅनेजर म्हणून कार्यरत. 'होमिओपॅथी एक वरदान' पुस्तकाचे लेखन, प्रकाशन.

- महाराष्ट्र मंडळ शिकागोमध्ये २०१० पासून कार्यरत. २०१३ साली अध्यक्षा, २०१४ ते २०१७ विश्वस्त, २०१४ मध्ये शिकागो मराठी शाळेची स्थापना, शिकागो मराठी शाळेस व हायस्कूल क्रेडिट्ससाठी इलिनॉय राज्याची मान्यता मिळण्यासाठी पुढाकार.

- बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका- (बृ. म. मं.) २०१७ मध्ये मराठी शाळा पुरस्कार, २०१७-२०१९मध्ये कार्यकारिणीवर सचिव.

- उत्तर अमेरिकेत अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये सहभाग. मराठी समाज म्हणून बृ. म. मंडळाचा आजवर केलेला प्रवास केवळ थक्क करणारा आहे. पुढच्या पिढीने बृ. म. मंडळामध्ये सक्रीय होणं ही तर काळाची गरज आहे. पुढच्या पिढीचा सक्रीय सहभाग आणि त्यांचं नेतृत्व हीच बीएमएमची ओळख करण्यासाठी प्रयत्नशील.

**सचिव: कोमल चौक्कर -** (अर्वाइन, कॅलिफोर्निया)



- कोमल विलेपार्ले (मुंबई) येथील मूळ रहिवासी. गेली २५ वर्षे दक्षिण कॅलिफोर्नियाची रहिवासी. येथे इंजिनीरिंग डिझाईन आणि कन्स्ट्रक्शन क्षेत्रात कार्यरत.

- २००५पासून स्थानिक मंडळात आणि २०१५च्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या लॉस एंजलीस येथील अधिवेशनात सहभाग, २०१७ -१९ बृ. म. मं. कार्यकारिणी सदस्य, .९ पासून बृ. म. मंडळातर्फे आयोजित मराठी शाळेच्या उपक्रमाची सहसंचालिका म्हणून मिळालेला अनुभव पाठीशी.

- कोमलचे आपल्या समाजातील तीन पिढ्यांशी दीर्घकाळ संबंध आहेत. तिच्या अनुभवांनी तिला आपल्या तरुण पिढीला मंडळाच्या पंखाखाली आणण्यासाठी तयार केले आहे. तिला बृ. म. मंडळ तसेच स्थानिक मंडळांचे सदस्यत्व वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न आणि आपल्या समाजातील सर्व घटकांसाठी असलेल्या उपक्रमांमध्ये अधिक सुधारणा करण्याचा, भविष्यात महाराष्ट्रातील निवडक एनजीओ बरोबर विधायक कार्यक्रमांना हातभार लावण्यासाठी योजना आखण्याचा मानस आहे.

**कोषाध्यक्ष: सोना भिडे (फिनिक्स, ॲरिझोना)**




- फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीत स्वयंसेवक आणि विविध पदाधिकारी भूमिकेत दोन दशके कार्य, सध्या मंडळाच्या सल्लागार समिती सदस्य. फिनिक्स मराठी शाळा संयोजक.

-बृ. म. मंडळावर २०१३-२०१५ कार्यकारिणी सदस्य, २०१५-२०१७ सचिव आणि बृ. म. मंडळ मराठी शाळा समिती सदस्य.

-फिनिक्स व भारतातील सामाजिक आणि लोककल्याणकारी संस्थांच्या मदतीमधे सहभाग. संगीत ऐकणे, उत्तम वाचन, विणकाम-हस्तकला, पर्यटन व परदेशी भाषा यांची आवड.

**कार्यकारिणी सदस्य: मिलिंद बावडेकर** (ॲटलांटा, जॉर्जिया)



- २०१५-१८मध्ये विश्वस्त, अटलांटा महाराष्ट्र मंडळ, २०१४मध्ये अध्यक्ष, अटलांटा महाराष्ट्र मंडळ.

- १९९८-२००१ या काळात लक्ष्मीनारायण नगर, गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्षपदावरून कार्य.

- इतर सामाजिक कार्य: युवा सक्षमीकरण, ढोल- ताशा पथक, Green Cell, MSG Foundation.

**कार्यकारिणी सदस्य: संदीप बेलखोडे** (ऑस्टिन, टेक्सास)



- अमेरिकेत गेली सतरा वर्षे वास्तव्य. अमेरिकेतील पूर्व-पश्चिम किनारपट्टीची शहरे, आणि कॅनडातील बऱ्याच मोठ्या शहरांमध्ये कामानिमित्त राहण्याची संधी. व्यवसायाने उद्योजक, बिझिनेस इंटेलिजन्स कन्सल्टंट, फॉर्च्युन १०० कंपन्यांसाठी व्यावसायिक बुध्दिमत्ता क्षेत्र-विषयक सल्लागार.

- ऑस्टिन मराठी मंडळावर कोषाध्यक्ष, तीन वर्षे समिती सदस्य. २०१६मध्ये मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नियोजनात पुढाकार. ऑस्टिन मराठी मंडळावर गेली अनेक वर्षे व्यावसायिक भारतीय कलाकारांना ऑस्टिन मंडळात आणण्यासाठी मुख्य समन्वयक, ऑस्टिन परिसरात पाच मोठ्या कार्यक्रमांचे यशस्वी संयोजन.

- २०१७-१९ बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य.

- सामाजिक कार्याची आवड असून यापूर्वीही विना नफा तत्वावर (क्रिकेट) संस्थेमध्ये खजिनदार व सचिव म्हणून चार वर्षे कामाचा अनुभव.

**कार्यकारिणी सदस्य: संदीप दीक्षित** (क्लिवलँड ओहायो)



- गेली तीस वर्षे अमेरिकेत स्थायिक.
- क्लिवलँड ओहायोमधील मराठी समाजासाठी गौरवणीय सामाजिक कार्य. सामान्य अमेरिकन आणि मराठी माणूस यांचे मैत्रीपूर्ण संबंध अजून दृढ करण्यासाठी गेली तीन वर्षे वार्षिक योगा महोत्सवाची सुरवात करण्यात पुढाकार.
- आता बृहन्महाराष्ट्र मंडळांची उत्तररंग ही ज्येष्ठ नागरिकांची योजना सर्व मराठी मंडळांपर्यंत पोचवण्याचे उद्दिष्ट.

**कार्यकारिणी सदस्य: शिल्पा कुलकर्णी (बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स)**

- बॉस्टन येथील विना-नफा संस्थांमध्ये १३ वर्षे कामाचा अनुभव.



- २०१३ सालच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात सक्रीय सहभाग व उत्तर अमेरिकेच्या कार्यक्रम समितीची सदस्य.
- २०१५-१६मध्ये न्यू इंग्लंड मराठी मंडळाच्या कार्यकारी समितीवर, २०१६मध्ये सचिव, २०१७-२०१८ अध्यक्ष.
- न्यू इंग्लंड मराठी मंडळाचे 'अनुबंध' हे त्रैमासिक २०१५ मध्ये चालू करून ४ वर्षे या त्रैमासिकाचे संपादक पदावर कार्य.
- मराठी साहित्य, नाटक, लेखन, अभिजात संगीत यांची आवड. बॉस्टन येथे मराठी नाटक व शास्त्रीय संगीत यामध्ये कार्यरत असणाऱ्या संस्थांशी संलग्न. मराठी मंडळाच्या कार्यक्रमांचे लेखन, दिग्दर्शन, संयोजन आणि काही नाटकांमध्ये अभिनय आणि संहिता लेखन.
- २०१८ मध्ये Wondermore Inc या बॉस्टन मधील कमी उत्पन्न असलेल्या शाळांमधील मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळावर नियुक्ती. 'सहेली' संस्थेसाठी निधिसंकलन करणाऱ्या 'निर्भया' समितीसाठी काम करत आहे 'सहेली' संस्था मॅसॅच्युसेट्समधील दक्षिण आशियाई महिलांना सुरक्षित व आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी सक्षम बनवण्याचे कार्य करते.

**कार्यकारिणी सदस्य: हेमा राचमाळे (डेट्रॉईट, मिशिगन)**

- हेमा राचमाळे यांचे मूळ गाव लातूर जिल्ह्यातील चिखली. अहमदपूर येथून विधी (कायदा) क्षेत्रात पदवी व औरंगाबाद येथे



मराठवाडा विद्यापीठातून पत्रकारितेतला पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण.
- डेट्रॉईट भागातील सामाजिक बांधणीसाठी मोलाचं योगदान. २००१ साली 'महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट'च्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष व २०१२-२०१४मध्ये मंडळाच्या विश्वस्तपदावरून कार्य.
- २००१ मध्ये मंडळाच्या मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असताना हेमा यांच्या अध्यक्षपदाखाली मंडळाची वेबसाईट सुरू झाली. 'डीलक्स' सभासदत्वाची संकल्पना याच वर्षीपासून राबविण्यात आली. तसेच संस्थेच्या कामात तरुणांचा सहभाग वाढावा म्हणून युवा समितीची निर्मिती करण्यात आली. हेमा यांच्या बरोबरच त्यांचे यजमान श्री. अविनाश राचमाळे, तसेच त्यांची मुले- रुची, आकाश आणि आदर्श यांचादेखील डेट्रॉईटच्या महाराष्ट्र मंडळ व बृ. म. मंडळ यांच्या उपक्रमात सक्रीय सहभाग असतो.

**यांशिवाय कार्यकारिणी सदस्य:**

**माजी अध्यक्ष: अविनाश पाध्ये** (बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स)

**वृत्त संपादक: विनता कुलकर्णी** (शिकागो, इलिनॉय)

**विश्वस्त समिती अध्यक्ष: राहुल कर्णिक** (डॅलस, टेक्सास)

- डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळाचे सदस्य.



- पत्नी, प्रिया आणि मुलगी, त्रिशा यांच्यासह डॅलसचे रहिवासी
- गेली २०+ वर्षे अनेक सामाजिक उपक्रमांत सक्रीय सहभाग.
- सामाजिक संस्थांमधील त्यांच्या सहभागाविषयी: बृ. म. मंडळावर कार्यकारी समिती सदस्य आणि विश्वस्त मंडळाचे सदस्य, डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळाच्या समितीवर सदस्य, व बृ. म. मं. प्रतिनिधी, वेबमास्टर, मराठी मित्र या संस्थेचे संस्थापक, सदस्य, अध्यक्ष. २०१९च्या अधिवेशनाच्या कार्यकारिणी समितीवर (कन्व्हेंशन एक्झिक्युटिव्ह कमिटी) आणि अधिवेशनासाठी कोषाध्यक्षपदावरून कार्य.

**विश्वस्त समिती सदस्य: मोहित चिटणीस** (सिॲटल, वॉशिंग्टन)



- बृहन्महाराष्ट्र मंडळाचे एक निष्ठावान कार्यकर्ते म्हणून मोहित चिटणीस ह्यांची ओळख आहे.
- २०१३ ते २०१७ ह्या चार वर्षांच्या कालखंडात मंडळाचे कोषाध्यक्ष ह्या नात्याने मंडळाचा कार्यभाग सांभाळल्यावर, २०१७ साली पुढील ६

वर्षांसाठी बृ. म. मंडळाच्या विश्वस्त समितीचे सभासद म्हणून त्यांची निवड झाली. बृ. म. मंडळाच्या घटनेची पुनर्रचना करण्याच्या कार्यात गेल्या वर्षी त्यांचा सक्रीय सहभाग होता. बृ. म. मंडळाच्या कायम स्वरूपाच्या ठेवीचा उपयोग इतर विश्वस्तांच्या व विद्यमान कार्यकारिणीच्या मदतीने मंडळाच्या कार्यासाठी योग्यरीतीने करण्याचा त्यांचा विचार आहे.

**विश्वस्त समिती सदस्य: नितीन जोशी** (शिकागो, इलिनॉय)



- बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो येथील २०११ सालच्या अधिवेशनाचे प्रमुख संयोजक, २०१३-१५मध्ये बृ. म. मंडळ कार्यकारिणीचे सदस्य आणि २०१५-१७ अध्यक्ष अशा विविध पदांवर कार्य
- २०१९-२०२५ कालखंडासाठी मंडळाच्या विश्वस्त समितीचे सदस्य म्हणून बिनविरोध निवड‘
- बृ. म. मंडळाच्या दूरगामी प्रकल्पांसाठी कार्य करण्याचा मानस.

बदलत्या काळानुसार उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाच्या गरजा समजून घेऊन काही नवे उपक्रम हाती घेण्यासाठी कार्यकारिणीस मार्गदर्शनपर कार्य करण्याचा मानस.

***

## बृ म. मंडळावर निवडून आलेल्या कार्यकारिणीचे आगामी उपक्रम (२०१९-२१)

**उत्तर अमेरिकेतील व भारतातील कलाकारांचे कार्यक्रम: (उपक्रम प्रमुख: शिल्पा कुलकर्णी, बॉस्टन)**

अशा कार्यक्रमांच्या निवडीसाठी तज्ञांची वेगळी समिती करून, भारतातून व उत्तर अमेरिकेतून उत्तम दर्जाचे कार्यक्रम लहान, मध्यम व मोठ्या मंडळांमधे आणणे, भारतातील आणि उत्तर अमेरिकेतील कलाकारांच्या सहकार्याने एकत्रितपणे काही शिबिरे व कार्यशाळा विविध मंडळांत आयोजित करणे.

**ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९: गूज अंतरीचे- नृत्य नाट्य - सादर कर्त्या - सुकन्या कुलकर्णी-मोने आणि सहकारी**

**जानेवारी-फ़ेब्रुवारी २०२०: भारतातील आणि उत्तर अमेरिकेतील कलाकारांचा संयुक्त कार्यक्रम**

**एप्रिल-मे २०२०: बृ. म. मंडळ नाट्यमहोत्सव**

अधिक माहिती लवकरच कळवण्यात येईल.

**बृ. म. मं. मराठी शाळा: (उपक्रम प्रमुख - कोमल चौक्कर, लॉस एंजलीस):**

उत्तर अमेरिकेतील विविध मंडळांमध्ये आणि इतरही देशांत बृ. म. मंडळातर्फे मराठी शाळा अभ्यासक्रम, परीक्षा यंत्रणा ऑनसाईट, ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देणे.

**उत्तररंग**: (**उपक्रम प्रमुख: संदीप दीक्षित, क्लिवलँड**)

उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी मंडळामध्ये जेष्ठांसाठी कार्यक्रम आयोजन आणि तरुण व जेष्ठ मंडळीमध्ये स्थानिक पातळीवर वैचारिक देवघेव वाढवणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. त्या अंतर्गत, जेष्ठांसाठी स्थानिक पातळीवर वर्षाला किमान एक तरी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आणि ज्यांना आवश्यक आहे अशा जेष्ठांसाठी कार्यक्रमांस उपस्थित राहताना कार राईड्स, (व्हॉलेंटरी विनामूल्य, किंवा शुल्क आकारून) सुरू करण्यासाठी स्वयंसेवकांमार्फत यंत्रणा कार्यान्वित करणे.

**बृहन्महाराष्ट्र वृत्त - (काही नवे उपक्रम)**

गेली ३९ वर्षे दरमहिन्याला प्रकाशित होणाऱ्या वृत्ताबरोबरच २०१९-२१कार्यकारिणीची काही नवीन उद्दिष्टे: बृहन्महाराष्ट्र वृत्त ॲप बनवणे. बृ. म. मंडळातर्फे लहान मुले व युवा विभागासाठी अशा वयोगटातील प्रतिनिधींतर्फे BMM Yuva Vrutta (Supplement by Kids, Youth and Teens) सुरू करणे.

**तंत्रज्ञान: (उपक्रम प्रमुख: संदीप बेलखोडे, ऑस्टिन**)

“Better connectivity for stronger community” हा आमच्या कार्यकारिणीचा मंत्र असून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व उपक्रमांसाठी आणि प्रकल्पांसाठी शक्यतो अत्याधुनिक तांत्रिक यंत्रणा आम्ही वापरण्याचे ठरवले आहे. असे काही प्रकल्प:

बृ. म. मंडळाचे संकेतस्थळ/वेबसाईटचे नूतनीकरण, बृ म. मंडळाच्या आजवरच्या सर्व अधिवेशनांबद्दल माहिती गोळाकरून त्याचा नीट आढावा घेणे, प्रौढ आणि युवा अशा सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी फ़ेसबुक ट्वीटर इन्स्टाग्राम इ- सोशल मीडियाचा वापर, बृ. म. मंडळाच्या निवडणुकांसाठी खात्रीशीर ऑनलाईन वोटिंग यंत्रणेसाठी प्रयत्न आणि अजून काही योजना विचाराधीन.

**बृ. म. मंडळ अधिवेशन २०२१ समिती:**

२०२१ च्या अधिवेशन समितीवर २०१९-२०२१चे बृ. म. मंडळ अध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव तसेच कार्यकारिणीवरील एक सदस्य हेमा राचमाले (डेट्रॉईट) आणि विश्वस्त समितीवरील एक सदस्य - राहुल कर्णिक (डॅलस) यांचा समावेश असेल.

**गूगल आर्काइव प्रकल्प:**

बृ म. मंडळाचे विश्वस्त समिती अध्यक्ष **राहुल कर्णिक** यांच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पाचे काम केले जाईल.

**युवा प्रकल्प:** (**उपक्रम प्रमुख: मिलिंद बावडेकर, ॲटलांटा सहाय्यक - नितीन जोशी, शिकागो**):

यूथ पॅनेल, टीन्स, यूथ समाविष्ट अशी वेगळी समिती बनवणे. मैत्र (Maharashtrian Association of Indian Youth Together Representing America- MAIYTRA) प्रकल्पाचे पुनरुज्जीवन, STEAM (Science, Technology Engineering, Art and Math) Project, वर्षातून दोन वेळा गप्पागोष्टी ते वधूवर मेळावा अशा उपक्रमांचा समावेश.

**बृ म. मंडळ मंच / BMM Helpline- “दीपस्तंभ” to show the right path: (उपक्रम प्रमुख हेमा राचमाळे, डेट्रॉईट, सयाय्यक- मोहित चिटणीस, सिॲटल)**

कायमचे वास्तव्य करण्यासाठी उ. अमेरिकेत आलेल्यांसाठी वैद्यकीय, आरोग्य आणि कार विमा, मुलांची आणि वृध्दांची काळजी घेणे, तसेच वैयक्तिक, शैक्षणिक व व्यावसायिक समस्या इत्यादींविषयी आपल्या मराठी समाजातील अशाप्रकारचे मदत-कार्य करणाऱ्या संस्थांबद्दल माहिती पुरवणे, उत्तर अमेरिकेत स्थलांतरित नवीन मराठी कुटुंबांना सुरुवातीला स्थिरस्थावर होताना येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठी मार्गदर्शन करणे हे उद्दिष्ट आहे.

***

## जाणिजे यज्ञकर्म...

**- मंजिरी जोशी** (कोपेल, टेक्सास)



बृहन्महाराष्ट्र मंडळाचं (बीएमेम) अधिवेशन झाल्यावर एका मैत्रिणीने सहज विचारलं, “केटरिंग कुणाचं होतं ग?” मी तिला अधिवेशनात तीन स्तरांवर चालणारी भोजनव्यवस्था समजावली तेव्हा तिने आश्चर्याने आ वासला. यापूर्वीच्या अधिवेशनात काम केलेली मोजकी माणसं सोडली तर बहुतेकांना ‘अधिवेशनाची भोजनव्यवस्था’ या प्रचंड आव्हानाची कल्पनाच नसते.

अधिवेशनासाठी खास मराठी पदार्थ शोधून काढायचे, अमेरिकन स्वच्छतेच्या नियमात ते पदार्थ शिजवायचे आणि चार हजार लोकांची तीन दिवस खानपान व्यवस्था ठेवायची हे शिवधनुष्य पेलण्यासारखं आहे. पेललं तर सर्वांना वाटतं ‘यात काय विशेष’ आणि नाही पेललं तर साफ आडवं व्हायची वेळ येते! ‘उदरभरणा’ला आपण ‘यज्ञकर्म’ म्हणतो, तर भोजनव्यवस्थेचा हा एक महायज्ञच म्हणायला हवा!

या अधिवेशनासाठी भोजन-समिती आणि भोजननियोजन-समिती असे दोन गट केले होते. भोजन-समितीत अनेक सुगरणी होत्या तर नियोजन-समितीत व्यवस्थापनातील अनुभवी लोक! एवढ्या मोठ्या प्रमाणावरील भोजनव्यवस्थेचा सर्वांचाच अनुभव शून्य! जिद्द मात्र भरपूर! शिवाय गेल्या अधिवेशनात ही व्यवस्था पाहिलेल्या मंडळींचंही बहुमोल मार्गदर्शन मिळालं.

मग ‘यशोधरा’ची भोजन-समिति मेनू ठरवण्याच्या कामाला लागली. महाराष्ट्राच्या विविध भागातील खास पदार्थांची यादी बनली. आपले नेहमीचे केटरर ‘राजभोग’चे सचिन मोदी यांची टीम भारतीय पदार्थ बनवण्यात वाकबगार! पण ‘भारतीय’ म्हणजे पंजाबी, गुजराती किंवा दाक्षिणात्य पदार्थ असतात इथे! मराठी पदार्थांचा देशोदेशी प्रसार करण्यात आपलं मराठी माणसांचं व्यावसायिक कसब जरा कमीच पडतं. त्यामुळे ओल्या नारळाच्या करंज्या किंवा कोंबडीवडे हे पदार्थ शेफना येणं अवघडच! मालवणचं सासम आणि मणगणं, खानदेशी फुणके अशा पदार्थांची तर नावंही कोणी ऐकलेली नसतात.

मग ‘मीनल’ने साऱ्या रेसिपीज एकत्र करायला घेतल्या. ‘अनघा’च्या करंज्या, ‘सुचित्रा’च्या कोथिंबीरवड्या, ‘सुजाता’चं पन्हं अशा हातखंडा पाकक्रिया बाहेर आल्या. काही रेसिपीज ऑनलाईन शोधल्या. ‘अमरजा’सारख्या उत्साही सुगरणींनी खास सीकेपी रेसिपीज दिल्या.

दोन महिन्यांच्या संकलनानंतर रेसिपीज आणि काही व्हिडीओज् ‘राजभोग’कडे सुपूर्द केले. लवकरच हे खास मराठी पदार्थ त्यांनी चांगलेच आत्मसात केले. मग एके दिवशी ‘यशोधरा’ आणि ‘वैदेही’ने ‘राजभोग’च्या न्यू जर्सीच्या सुविधागृहाला भेट दिली, दिलेल्या रेसिपीजप्रमाणे बनवलेले पदार्थ चाखून पाहिले आणि काही सूचना देऊन दोघी परतल्या. ‘राजभोग’ने अगदी जेवणानंतरच्या मुखवासापासून सारे पदार्थ रेसिपीबरहुकूम केले होते. मात्र मसाले मनासारखे जमले नव्हते, ते भारतातून मागवण्यात आले. पेशवाई जेवणात अळूची भाजी हवीच! पण अळू कुठे मिळणार? मग पुण्याच्या ‘श्री देवश्री प्रॉडक्ट’कडून इन्स्टन्ट अळूभाजीची पोती आली. ‘बेडेकरां’नी प्रायोजित केलेले उकडीचे मोदक आणि बटाटेवडे भारतातून येणार होतेच.

आता नितीनची संयोजन समितीही कामाला लागली होती. ‘राजभोग’चं केटरिंग ठरलं असलं तरी कन्व्हेंन्शन सेंटरवर नेहमी काम करणारं ‘सेंटरप्लेट’चं केटरिंगही आवश्यक होतं. त्यांच्या सेवकांना जागा ओळखीची असल्यामुळे किचनमध्ये मदत, पदार्थांची ने-आण, स्वच्छता या गोष्टी सहज जमण्यासारख्या होत्या.

भोजनगृह भरपूर मोठं होतं. पण त्याचा योग्य वापर होण्यासाठी, कामात सुसूत्रता येण्यासाठी ‘विवेक’, ‘अजय’ यांनी सुंदर आराखडा बनवला. ‘आयेशा’ने टेबलमांडणी, पदार्थांची लेबल्स करण्यात पुढाकार घेतला. त्यांचा आराखडा, डिझाइन्स आणि कलरकोडिंग इतकी छान होती, की ‘सेंटरप्लेट’ने मुद्दाम मागून घेतली, भविष्यात वापरण्यासाठी!

मात्र खरी कसोटी होती प्रत्यक्ष अधिवेशनकाळात! डे झिरोला सकाळी सात वाजता नाश्ता मिळणार तर पहाटे साडेतीनला दोघीजणी चव घ्यायला गेल्या होत्या. नाश्ता संपेपर्यंत मालवणी भोजनाच्या टेस्टिंगसाठी पुढच्या चार सदस्या हजर! मग हा सिलसिला चारही दिवस चालू राहिला. मगच पदार्थ गरम भांड्यात भरले जायचे.

त्याचवेळी नियोजन-समिती पाहुण्यांचं स्वागत करत होती, त्यांना मार्गदर्शन करत होती, गर्दीचं नियोजन करत होती; प्रसंगी शांतपणे सुस्मित राहून वाद निपटत होती. गलका आणि गर्दी नसली, की प्रसन्न वातावरणात भोजनाची चव वाढते! डे वनला उद्घाटनानंतर खरी गर्दी लोटली; पण बुफेच्या अठरा पंक्ती, जेवायला चारशे टेबल्स यामुळे रांगा लागल्या नाहीत, बसून गप्पा मारत 'खमंग खानदेशी' भोजनाचा आस्वाद घेता आला. त्या दिवशी आषाढी एकादशी होती म्हणून उपवासाचे पदार्थही वेगळे मांडले होते.

त्यानंतर 'पुरेपुर कोल्हापूर', 'पेशवाई', 'टेक्स-मेक्स' अशा नानाविध प्रकारांमुळे 'आज नवीन काय' अशी उत्सुकता सर्वांना वाटायची. भोजनगृहात येऊ न शकणारे अनेकजण होते...एक्स्पोचे स्टॉलधारक, स्वयंसेवक आणि कलाकारही! त्यांच्यासाठी बॉक्स-लंच देण्यात 'वैदेही' जातीने लक्ष घालत होती. कार्यक्रमांच्या मध्यांतरात 'चन्दू'ची टीम चहाची व्यवस्था पहात होती. अधिवेशनातले छानछान कार्यक्रम कोणीच धड पाहू शकले नाहीत. पण लोक जेवून तृप्त झाले, त्यांच्या पसंतीच्या असंख्य प्रतिक्रिया आल्या, याचं मोठ्ठं समाधान होतं.

लोकांच्या हृदयांत शिरणारा राजमार्ग पोटातून जातो हेच यातून सिध्द होतं, नाही का?

***

# वारी

- **शीतल डोळस** (सॅन होसे, कॅलिफोर्निया)

ज्याप्रमाणे दरवर्षी आषाढी वारीनिमित्त लाखो वारकरी विठ्ठलावरील अपरंपार भक्तीने पंढरपूरकडे आकर्षित होतात, अगदी त्याच उत्साहाने व उत्कट भावनेने हजारो मराठी मने आपल्या संस्कृतीच्या प्रेमापोटी दर दोन वर्षांनी अमेरिकेत होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (BMM) अधिवेशनाकडे आकर्षित होतात.

या वर्षी अमेरिकेतील टेक्सस राज्यात झालेल्या अधिवेशनात आषाढी एकादशीच्या दिवशीच "वारी पंढरीची" हा वारीचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या दिवशी टेक्सास मधील डॅलस ही जणू पंढरीच झाली होती. गगन-भरारी घेण्याच्या उद्देशाने अमेरिकेत आलेल्या परंतु आपल्या मराठी मातीतच गुंतलेल्या साऱ्या मराठी मनांना महाराष्ट्राबरोबरच वारीचा उत्कट अनुभव घेता यावा या उद्देशाने, सॅन फ्रान्सिस्को (बे एरिया) येथील कलाकारांनी "वारी पंढरीची" हा वारीचा सांगीतिक प्रवास दर्शविणारा अभूतपूर्व कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास सुप्रसिध्द शास्त्रीय गायक पंडित श्री. विजय कोपरकर व सुप्रसिध्द ऑर्गन व हार्मोनियम वादक श्री. राजीव परांजपे हे आवर्जून उपस्थित होते. त्या दोघांनीही कार्यक्रमाचं तोंडभरून कौतुक केलं.

त्याआधी कॅलिफोर्नियामधील सॅन होजे येथे या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमाद्वारे टाळ, झेंडे, तुळशी वृंदावन, झिम्मा-फुगड्या यांच्यासह दिंडी व पालखी सोहळा पार पडला.

अमेरिकास्थित वारकऱ्यांनी, अगदी उत्साहपूर्ण वातावरणात संत ज्ञानेश्वर माऊली व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या अगदी वाजत-गाजत व मिरवत आणल्या. वाखरी प्रमाणेच दोन्ही पालख्यांची भेट घडवून आणली. विशेष म्हणजे या पालख्या तेथील हौशी कलाकारांनी घरी बनवल्या होत्या. "ग्यानबा-तुकाराम", "विठोब्बा-रखुमाई", "ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानराज माउली तुकाराम" अशा गजरात वातावरण दुमदुमून गेले.



दिंडीनंतरच्या सांगीतिक कार्यक्रमामध्ये वारीचा संपूर्ण प्रवास उलगडून दाखवण्यात आला. रंगमंचावरील सुंदर सजावट, विठ्ठल-रखुमाईचं विलोभनीय मंदिर, त्यावरील आंब्यांच्या पानांचं



तोरण, मंदिरात विराजमान विठ्ठल-रखुमाईच्या प्रसन्न मूर्ती, त्यांच्या गळ्यातील तुळशीहार, अशा विठ्ठलाने भारलेल्या रंगमंचावर काही परिचित व काही अपरिचित अशा वेचक गाण्यांचे वेधक सादरीकरण, अत्यंत माहितीपूर्ण व हृदयस्पर्शी निवेदन, प्रसंग जिवंत करणारी स्थिरचित्रे, भारूड, समर्पक साथ संगीत या सर्व पैलूंद्वारे इतका सुरेख परिणाम साधला गेला, की श्रोत्यांना जणू आपण प्रत्यक्ष वारीत असल्याचीच प्रचिती आली.

आदित्य रानडे या उदयोन्मुख कलाकारानं आपल्या अप्रतिम गायनानं श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. 'माझे माहेर पंढरी' या अभंगाद्वारे त्याने माहेरच्या आठवणींनी श्रोत्यांचं मन चिंब केलं. पूजा पुरंदरे यांनी गायलेलं 'अवघा रंग एक झाला' हे गाणं इतकं सुरेख होतं, की ते ऐकताना श्रोते पांडुरंगामध्ये विलीन झाले होते. शर्वरी डोळस यांनी उत्कृष्ट हावभाव व नृत्य यांच्यासह भारुड या लोककलेचं सामर्थ्य रसिकांपर्यंत पोहचवलं. श्रीवर्धन जोशी यांनी आपल्या 'अवघे गर्जे पंढरपूर' द्वारे रसिकांना थेट पंढरपुरात नेऊन सोडलं. त्यातील 'देव दिसे ठायी ठायी' हे कडवं ऐकताना रसिकांना प्रत्यक्ष समोर देव दिसल्याचीच प्रचिती आली. श्रीरंग बगे यांच्या 'जातो माघारी पंढरीनाथा' या गाण्याने वारकऱ्यांच्या परतीची भावना इतकी सुरेख रेखाटली, की हा प्रवास संपायलाच नको अशी हुरहूर रसिकांच्या मनाला लागली. भास्कर रानडे यांनी वारीची व वारकऱ्यांची प्रासंगिक आणि समयोचित स्थिरचित्रे मोठ्या पडद्यावर प्रक्षेपित करून प्रत्येक गाण्याला व प्रसंगाला जिवंतपणा आणला. शीतल डोळस यांनी माहितीपूर्ण निवेदन नाट्यमयरित्या सादर करून वारीचे अनेक पैलू रसिकांसमोर उलगडले. अमेय देशपांडे यांच्या सुमधुर बासरीवादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. श्री. विवेक दातार यांनी अप्रतिम पेटीवादनातून आपल्या बोटांची जादू रसिकांसमोर सादर केली. बालकलाकार अजिंक्य रानडे याने अचूक टाळ वादनाने श्रोत्यांना अचंबित केले. राहुल झिंगडे व तेजस व्यंकटेश्वरन यांनी तबल्याच्या तालावर श्रोत्यांना डोलायला भाग पाडले.

सांगीतिक कार्यक्रमानंतर उपस्थितांना चुरमुरे, बत्तासे, फुटाणे असा खास पंढरपुरी प्रसाद देण्यात आला. त्याचबरोबर प्रत्येक कुटुंबाला वारीची आठवण म्हणून टाळ ही भेटवस्तू देण्यात आली. शेवटी अगदी वारीतील जेवणव्यवस्थेप्रमाणे प्रत्येकाला पिठलं, पोळी, ठेचा, शिरा अशा जेवणाचा महाप्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

श्रीमती मंदाकिनी डोळस यांनी या कार्यक्रमाची संहिता तयार केली होती. भास्कर रानडे व शीतल डोळस यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले होते, तर कॅलिफोर्नियाच्या 'महाराष्ट्र मंडळ बे एरिया' या संस्थेने कार्यक्रमाची निर्मिती केली होती.

महाराष्ट्र मंडळ बे एरियाचे अध्यक्ष श्री. विराज राऊत, श्रीमती वृषाली राऊत, श्रीमती दीप्ती शिंगणापूरकर, श्रीमती पद्मा रानडे, श्रीमती मृदुल देशपांडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या अविरत कष्टांवर व अनेक दानशूर देणगीदारांच्या आधारावर हा कार्यक्रम उभारला गेला. आतापर्यंत या कार्यक्रमाचे ३ प्रयोग झाले, आणि प्रत्येक प्रयोगाला रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला व भरभरून कौतुकाचा वर्षाव केला. कार्यक्रमाचे काही फोटो: https://drive.google.com/drive/u/0/folders/1-TV_TjhuCd1ROW1YPbZL7mD3xmM2abNO?ths=true

भक्ती, उत्साह, लोककला, संगीत आणि संस्कृती या सर्वांचा उत्कट सोहळा असलेली आपली परंपरा म्हणजे वारी. परदेशात राहणाऱ्या अनेकांना महाराष्ट्राच्या या ७५० वर्षांच्या परंपरेला मुकावं लागतं आणि ही उणीव भरून काढण्यासाठी अमेरिकेत वेगवेगळ्या शहरात व भारतातही पुणे, मुंबई, व इतर शहरात या कार्यक्रमाचं आयोजन व्हावं अशी मागणी अनेक उपस्थितांमार्फत जोर धरू लागली आहे. त्यासंबंधित अधिक माहितीसाठी संपर्क:

भास्कर रानडे (branade@yahoo.com),

शीतल डोळस (sheetal_dolas@yahoo.com)

***

**Dr. Mohan Durve / CME Travels tours 2019-20**
**Contact: 888-794-1995 or 440-845-7272**
**mjdurve@sbcglobal.net**
***Japan (Cherry Blossoms) Mar 1-14, 2020 $5099***
**Northern Lights Iceland** wkly dept **Oct - Dec $2449**
***Germany with Oberammergau passion play**
**(every 10 years) Aug 3 - 15, 2020 $4999***
**Bangkok , Vietnam, Cambodia, Laos, Bali 12/17-1/3 $4185**
**Beijing, Xian, Shanghai April 15 - 24, 2020 $2299**
**Australia-New Zealand every month $3999**
**South Africa every month $3099**
**South America every month $2999**
**S. American Cruise/Chilean fjords 12/16/20 $4699**
We specialize in private tours to any destination
of your choice anytime of the year!



# 'नृपो'ची रौप्यमहोत्सवी वाटचाल

- **वसुंधरा पर्वते** (डब्लिन, ओहायो)



अमेरिकेत राहणाऱ्या संजीवला भारतातून फोन येतो, 'आई अत्यवस्थ, ताबडतोब ये.'

तातडीने विमानाचं तिकीट काढून तो भारतात जायला निघतो. मग 'उगीच आलो परदेशात' या विचारापासून 'होईल का भेट' असं वाटून त्याचं मन सैरभैर झालेलं असतं. एकुलत्या एका मुलाच्या दर्शनासाठी इकडे आई व्याकुळ झालेली असते.

परदेशी गेलेल्या मुलांच्या कुटुंबात घडणारा हा प्रातिनिधिक प्रसंग, भारतात राहिलेल्या आईवडिलांच्या आयुष्यातला हा सर्वात अवघड क्षण- ज्या क्षणाला सामोरं जाण्याची वेळ बहुतेकांवर येते.

मुलं दूर गेल्यामुळे आईवडिलांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या समस्यांचं गांभीर्य जाणवलं ते पुण्यातले न्यायाधीश ना. ल. अभ्यंकर यांना, तेही स्वतःचं कुणीही परदेशी नसताना. वयाच्या ८७व्या वर्षी २५-३० पालकांना घेऊन त्यांनी २८ सप्टेंबर १९९४ रोजी नृपो (Non Resident Indians' Parents' Organization) या संस्थेची स्थापना केली. गेली २५ वर्षे पुण्यात कार्यरत असलेल्या या संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने सर्वांना या संस्थेच्या कार्याची ओळख व्हावी हाच या लेखाचा हेतू आहे.

सुरुवातीला संस्थेचं उद्दिष्ट एकच. मुलं परदेशात हा समान धागा धरून ओळखी करायच्या, त्यातूनच मैत्री आणि मैत्रीतून परस्पर सहकार्याची भावना निर्माण होईल, आजारपण, इतर अडचणी यांच्यावर एकमेकांच्या मदतीनं मात करणं सोपं होईल हा हेतू. त्यासाठी पुण्याचे २०-२५ विभाग केलेले आहेत त्या त्या विभागातले सदस्य साधारण दर महिन्याला एकत्र जमतात आणि त्यातूनच आधार-गट तयार होतात.

नृपो परिवाराची डिरेक्टरी (नांव, पत्ते यांची यादी) आहे, स्वतःचं पुण्यात ऑफिस आहे, दर तीन महिन्यांनी प्रकाशित होणारं नृपोजगत हे नियतकालिक आहे. नृपोतर्फे अनेक जिव्हाळ्याच्या विषयांवर व्याख्यानं आयोजित होतात. संस्थेचा स्थापना-दिन ('फाऊंडेशन डे') साजरा होतो. संस्थापक न्या. अभ्यंकरांच्या नावाने वृध्दसेवाव्रतींना पुरस्कार दिला जातो. संक्रांत, वासंतिक, दिवाळी इ. सणांनिमित्त मेळावे साजरे होतात. मेळाव्यांमध्ये सादर होणाऱ्या नृत्य-नाट्य-संगीताच्या कार्यक्रमात नृपोतल्या वयोवृध्द तरुणांचा उत्साह ओसंडून जात असतो.

नृपोचा व्याप जसा वाढत गेला, तशी लोकांना नृपोची माहिती व्हायला लागली. 'टाईम', 'आऊटलूक' आणि अनेक मासिकातून नृपोविषयी लेख प्रसिध्द झाले, टीव्हीवर अध्यक्षांची मुलाखत झाली, पुण्याच्या नृपोपासून स्फूर्ती घेऊन गुजरातमध्ये बडोदा येथे 'नृपा' (NRI Parents' *Association* ) स्थापन झाली.

एखाद्या सदस्याला रात्रीबेरात्री अचानक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावं लागलं तर आगाऊ पैसे भरल्याशिवाय रोग्याला वैद्यकीय सेवा मिळत नसे. नृपोने पुण्याच्या अनेक हॉस्पिटल्समध्ये ही सवलत खूप प्रयत्नांती मिळवली.

www.nripopune.org हे नृपोचे संकेतस्थळ (वेबसाईट) आहे. सध्या नृपोची धुरा संभाळण्याचं काम अध्यक्ष श्री नंदकुमार स्वादी आणि सचिव सुभाष कुळकर्णी करीत आहेत.

गेल्या २५ वर्षात नृपोने, मुलं 'दूर देशी' असल्यामुळे असुरक्षित वाटणाऱ्या सदस्यांच्या हिताचा, त्यांच्या समस्यांच्या सोडवणुकीचा आणि त्यांच्या आनंदाचा विचार करून अनेक उपक्रमांविषयी कल्पना मांडल्या. कार्यकर्त्यांची वयं, काम करण्याच्या मर्यादा, सतत बदलत राहणारी कार्यकारिणी/समिती या अडथळ्यातून मार्ग काढत नृपोची वाटचाल सुरूच आहे.

अनेक वर्षे नृपोच्या संपर्कात असलेल्या सदस्यांना विचारलं तर बहुतांश मंडळींना नृपोचा नानाविध प्रकारे लाभच झालेला आहे, असंच ऐकायला मिळेल. बहुतेकांना नवीन स्नेही मिळाले, गायन, वादन, नृत्य, वक्तृत्व, नाट्य, लेखन याची आवड असलेल्या मंडळींना वाव मिळाला, सहलींतून विरंगुळा मिळाला. अडचणीच्या वेळी हक्काने बोलवता येतील अशी माणसं मिळाली, एकाकीपण आलेले केवळ आपणच नाही आहोत, समस्त नृपो परिवार आपल्यासोबत आहे, ही भावना जगण्यासाठी उमेद देऊन गेली. आणि म्हणून तर २५ वर्षांनंतरही आजही संस्था उभी आहे. परदेशातली मुलं जेव्हा भारतात येतात आणि नृपोच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतात तेव्हा आपल्या आईवडिलांचा हा नृपो परिवार पाहून त्यांची काळजी कमी होते असा अनुभव आहे.

आज परिस्थिती थोडीशी बदलली आहे, संपर्काची साधनं वाढली आहेत, म्हातारपणी मुलांनी जवळच राहून आधार द्यावा ही मानसिकता बदलली आहे. त्यामुळे मुलं जवळ नसल्यामुळे आईवडिलांच्या आयुष्यात जी अपरिहार्य पोकळी निर्माण व्हायची ती अजूनही असली तरी तिची तीव्रता आता निश्चितपणे कमी झालेली आहे. तरीही नृपोचं कार्य जोमाने चालू आहे. त्यामुळे कार्यकारिणी बदलो, सदस्य येवोत-जावोत, जोपर्यंत परदेशी जाणाऱ्या मुलांचा ओघ चालू आहे तोपर्यंत नृपोची गरज भासणार आणि तिचं कार्य चालूच राहणार. फक्त नृपोचा झेंडा एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती जाईल एवढंच!

***

# माहेरची बाग

**- विद्या देशमुख** (ग्रीनव्हील, साऊथ कॅरोलायना)



घराकडे जाणाऱ्या त्या पायवाटेच्या दोन्ही बाजूंना असलेली बाग पहात पहात पुढे जाण्यात एक अवर्णनीय आनंद वाटे. श्रावणात पहाटेस पारिजातकाच्या फुलांनी ती पायवाट भरून जायची. एक मंद सुगंध पहाटेच्या गारव्यात मिळून जात असे आणि ती बाग एका स्वर्गीय पावित्र्याने भरून जात असे. फुलांच्या सड्यात शांतपणे उभ्या असलेल्या पारिजातकाच्या सान्निध्यात रहाण्याचा अवर्णनीय आनंद ह्या बागेतच मला मिळाला. “पारिजात की हास्य शिवाचे भूमीवर निखळे” ही दैवी अनुभूती केवळ इथेच मला लाभली..

तर असा तो बागेच्या दाराशी असलेला पारिजात! मनाचा एक कोपरा आठवणींच्या सुगंधाने सदैव दरवळत ठेवणारा... डावीकडे पारिजातकासमोर लाल जास्वंद आणि तिच्यामागे पानापानांत बहरलेली दुहेरी तगर. जास्वंद आणि तगर वर्षाचे बाराही महिने फुलत असत.

त्यांच्या मागे एका कोपऱ्यात सोनचाफ्याचे झाड आईने अगदी कौतुकाने लावले होते. त्या चाफ्याचे एखादे फूलही लगेच एका लहानशा पाण्याने भरलेल्या गडूवर आपल्या एकदोन पानांसह मोठ्या ऐटीत विराजमान होत असे.

डावीकडे थोडे पुढे तुळशीची जागा होती. तिथे कायम कृष्णतुळस डवरलेली असे. उन्हाळ्यात मंजिऱ्या सुकून जमिनीवर पडत आणि पावसाळ्याच्या सुरवातीस नवी रोपे आजूबाजूला उगवत असत. आई त्यांना जपून वाढवत असे.

उजवीकडे एक नाजूकसे डाळिंबाचे झाड होते. डाळिंबे लागली आणि ती मोठी होऊ लागली, की त्यांच्या वजनाने फांद्या खाली वाकत. फळ फार मोठे नव्हते पण ते झाडावरच पिकत असे. पिकून त्याला तडा गेल्यावरच ते काढले, की फार सुंदर, डाळिंबी रंगाचे गोड दाणे त्यातून निघत. त्यांची आंबट-गोड किंचित तुरट चव अजूनही जिभेवर रेंगाळते आहे. कितीतरी वर्षे ती फळे आम्ही सर्वांनी, नातलगांनी आणि अगदी आई-आप्पांच्या नातवंडांनीही खाल्ली. ह्या झाडाशेजारीच दुसरे एक झाड डाळिंबाच्या नुसत्या फुलांचेच होते. गर्द अबोली-शेंदरी रंगाची ही फुले फार सुंदर दिसत.

देवगडच्या हापूस आंब्याचे एक कलम आईने खास मागवले होते. त्या आंब्याचे फळ फारच मोठे आणि सुमधुर होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोळी आलेली नातवंडे सकाळचे आठ-साडेआठ वाजले तरी उठायला तयार नसत. मग आप्पा हसत हसत म्हणत “चला आंबे खायला...” आणि काय गंमत! पटापट सगळी मंडळी उड्या मारून बिछान्याबाहेर येत आणि भराभर तोंडे धुवून स्वैपाकघरात पळत. त्यानंतरचे दृष्य फारच नयनरम्य असे. एक मोठ्ठे ताट पुढे घेवून आई विळीवर आंबे कापत आहे आणि बच्चे मंडळी त्या ताटाभोवती बसून मनसोक्त आंबे खात आहेत! अजूनही ते चित्र डोळ्यांपुढे तरळत आहे. आज ही नातवंडे मोठी होवून आपआपल्या संसारात रमली आहेत पण त्यांच्यासाठी बालपणचा हा आनंद “विसरू म्हणता विसरेना...” अशा प्रकारच्या आठवणींमधला एक ठेवा बनून राहिला आहे.

ह्या झाडाच्या बाजूलाच होते सीताफळाचे झाड. त्या झाडालाही भरपूर फळे येत. झाडावरच पिकलेले सीताफळ अतिशय मधुर लागे. बागेच्या एका कडेला असलेल्या आंबा, सीताफळ, पेरू आणि कढीपत्ता ह्या झाडांपुढे बागेच्या आतील बाजूस बरीच फुलझाडे दाटीवाटीने लावलेली होती. त्यात कुंद, पांढरा गुलाब, सोनटक्का, कवठी-चाफा, ब्रम्हकमळ, अबोली, लाल गुलाब इत्यादी झाडे होती. कवठी-चाफ्याचे फूल फुलू लागले, की असा काही सुगंध दरवळायचा बागेत! तसेच ब्रम्हकमळाचे ते अप्रतिम सुंदर असे फूल पहाण्यासाठी कितीतरीजण बागेत येऊन जात असत. त्याच्या समोरचे लिंबाचे झाड म्हणजे त्या बागेची शानच जणू! वर्षाचे बाराही महीने लिंबांनी भरलेले असे. ह्या घरी आलेले पै-पाहुणे लिंबाचे सरबत न पिता कधीच घराबाहेर पडले नाहीत. त्या लिंबाला एक वेगळाच स्वाद होता आणि प्रत्येकाला तो हवाहवासा वाटे.

इतरही अनेक झाडे त्या बागेत आलटूनपालटून फुलत. डावीकडे जसा घराच्या बाजूला पावसाळ्यानंतर सोनटक्का फुले तसेच उजवीकडे उन्हाळ्याच्या सुरवातीला अबोली फुलत. लाल गुलाब, मोगरा, बटण-शेवंती, लिली, कर्दळी, गुलबक्षी आपआपल्या परीने फुलत असत. फळे, फुले, भाज्या इत्यादी सर्व काही ह्या बागेकडून आम्हाला मिळाले. पण सर्वात मोठी देणगी म्हणजे ह्या बागेमुळेच मातीवर आणि मातीत उगवणाऱ्या झाडाझुडुपांवर प्रेम करायला शिकलो आम्ही. मात्र त्यामागची खरी प्रेरणा ही आई-आप्पांची होती. खरंच आई झाडांवर मनापासून प्रेम करत असे. एकदा तिने एक बोगनवेलीचे रोप बागेच्या कडेला लावले होते. पण त्या बोगनवेलीचा रंग कसातरीच मातकट ब्राउनिश निघाला. कुणीतरी तिला ते झाड चांगले दिसत नाही म्हणून काढून टाकायला सांगितले तर केवढा राग आला होता तिला! ती म्हणाली होती, “अरे! चांगलं दिसत नाही म्हणून लगेच काढून टाकायचं का ते? काही नाही काढायचं ते!” असं होतं तिचं झाडांवरचं प्रेम.

अशी ही माझ्या माहेरच्या घरापुढची बाग. साधीसुधीच पण प्रेमाने जोपासलेली! एक शांत तृप्ती त्या झाडांवर पसरलेली होती. त्या बागेत एक पावित्र्य नांदत होते. प्रेम कसे रुजवायचे, सगळ्यांची कशी काळजी घ्यायची असते, आणि एकदा जोडली गेलेली माणसे कधीच तोडायची नसतात हेदेखील घरापुढच्या ह्या बागेतूनच आम्हाला कळले!

***

# डिजिटल मार्केटिंग सल्लागार, लेखक आणि वक्ता: मकरंद उत्पात

**- विनता कुलकर्णी** (शिकागो)

गेली ३०+ वर्षे अमेरिकावासी मकरंद उत्पात मूळचा मुंबईकर.




मध्यमवर्गीय कुटुंबात, मुंबईतील झोपटपट्टीला लागूनच असलेल्या जेमतेम ३२० चौरस फूट जागेतील अपार्टमेंटमधे आईवडील, भावंडे आणि आजी यांच्यासह राहत तो लहानाचा मोठा झाला. प्रतिकूल परिस्थितीतून पुढे जाण्यासाठी काय आवश्यक असते याचे बाळकडू त्याला तेव्हाच मिळाले.

भारतात शालेय शिक्षण आणि 'प्रॉडक्शन इंजिनीअरिंग'मधे बॅचलर पदवी मिळवून १९८८मधे मकरंद उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत आला. न्यू जर्सी इंस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मधून त्याने 'कॉम्प्युटर सायन्स'मधे मास्टर्स पदवी मिळवली, आणि कॉर्पोरेट क्षेत्रात पदार्पण केले. सॉफ्टवेअर प्रोग्रामर म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केल्यावर, कॉर्पोरेट शिडी भराभर चढत, आयबीएम, जॉन्सन अँड जॉन्सन अशा फॉर्च्युन **500** कंपन्यांमधे कामाचा अनुभव मिळवत त्याने एकीकडे एच-१ व्हिसा, ग्रीन कार्ड, सिटिझनशिप असा पल्लाही पूर्ण केला. या दरम्यान त्याने नेतृत्वगुण जोपासले आणि फार्मा आय टी व मार्केटिंग क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवले.

अशा या एकरेषीय वाटचालीत अचानक, आयटी क्षेत्रातील स्वत:च्या नोकरीवर बेतल्यावर मकरंदच्या लक्षात आले, की सध्याच्या सायबर जगतात, गूगलवर त्याच्या पाऊलखुणांचा मागमूसही नाही. आजवर आपली ओळख म्हणजे केवळ जॉब हॉपर... विविध कंपन्यांच्या गरजेनुसार तेथील जबाबदाऱ्या सांभाळत पदे सुशोभित करणे! आणि कंपनी सोडल्यावर तेथील आपले पद, स्टेटस त्याला अर्थशून्य वाटू लागले.

मकरंद सांगतो, नर्सिंगहोमला एकदा भेट दिली असताना, तेथील ८०-९० वर्षे वयाच्या वृध्दांना आयुष्याबद्दल काही खंत आहे का असे विचारले, अन् काहींच्या उत्तरांमधे एक समान विचार आढळला. तो म्हणजे, पूर्वी मनापासून करावेसे वाटणाऱ्या काही गोष्टींचा पाठपुरावा केला नाही. आपलीही भविष्यात अशी कहाणी होऊ नये, या विचाराने त्याने अंतस्थ आवाजाला प्रतिसाद देत आवडीच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले. त्याच्या कुटुंबानेही त्याला आयुष्यातील या वळणावर पाठिंबा दिला.

नेतृत्व, डिजिटल मार्केटिंग, व्यवसाय-प्रशिक्षण आणि उद्योजकता (leadership, digital marketing, business coaching and entrepreneurship.) या विषयांवर आजवरच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील स्वानुभवातून, मकरंद उत्पात याने आजवर चार पुस्तकांचे लेखन, सह-लेखन केले. ही पुस्तके अमेरिकेत 'बेस्ट सेलिंग बुक्स' यादीतही झळकली आणि त्यांस अमेरिकेतील अनेक माध्यमांनी, दूरदर्शन वाहिन्यांनी मुलाखतीतून आणि काही सामाजिक कार्यक्रमातून नावाजले. उदाहरणार्थ सी स्विट टीव्ही नेटवर्क (C-Suite TV Network -The Hero Club for CEOs - www.c-suitetvnetwork.com ), आमंत्रित वक्ता म्हणून एक्सपर्ट इन्साइट्स रेडिओ शो, रेडिओ चाय, रेडिओ मराठी वैभव इत्यादी. याशिवाय त्याचे सोशल मीडिया, पर्सनल एक्सीलन्स आणि डिजिटल मार्केटिंग विषयांवर यूट्यूबवर (www.youtube.com/c/makarandutpat) १००+ व्हिडिओज आणि व्यावसायिक-शिक्षणविषयक www.Udemy.com या प्रसिध्द संकेतस्थळावर त्याचा डिजिटल मार्केटिंग क्लास उपलब्ध आहे.

लघु उद्योजकांसाठी डिजिटल, सोशल मीडिया हे अतिशय प्रभावी माध्यम असल्याने गूगल ॲमेझॉन, यूट्यूब, लिन्क्ड इन, ट्वीटर, इन्स्टाग्राम, इत्यादी माध्यमांचा बिझिनेसचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा निर्माण करण्यासाठी कसा उपयोग करावा, हे मकरंदच्या कन्सल्टिंग एजन्सीचे उद्दिष्ट. (अधिक माहितीसाठी संपर्क: utpatmakarand@gmail.com)

याव्यतिरिक्त मकरंद 'मराठी विश्व' न्यू जर्सी- मंडळाच्या 'बोर्ड ऑफ डिरेक्टर' पदावर आहे. समान विचारांनी प्रेरित काही व्यावसायिक उच्चशिक्षित इंडोअमेरिकन मित्रांसह त्याने India Roots, USA ही विना नफा तत्वावरील संस्था स्थापन केली. त्याद्वारे 'जल्लोष' ढोल ताशा लेझिम पथक नावारूपास आले. त्यातूनच सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमातून आजवर गरजूंसाठी सुमारे ४५,००० डॉलर्स निधीसंकलन केले. याशिवाय तो व्यावसायिक दर्जाचा 'पर्कशनिस्ट' आहे. न्यू यॉर्क, न्यू जर्सी परिसरात बँडमधे हिंदी, बंगाली, तमिळ, मराठी आणि गुजराती या भारतातील प्रादेशिक भाषांमधील संगीतास इलेक्ट्रॉनिक ऑक्टोपॅड, तबला, ढोल, ढोलक, कॉन्गा हँड्सोनिक आणि ताशा अशा विविध वाद्यांवर तो साथ करतो. फावल्या वेळात स्वत:च्या आईकडून शिकून अमेरिकेत मकरंदने जोपासलेला अजून एक छंद आहे- पाककला. 'फूड नेटवर्क'वर पाहून विविध पाककृती बनवणे आणि मित्रमंडळींना खाऊ घालणे त्याला मनापासून आवडते.

फोन, संगीत, ॲनिमेटेड मूव्हीज, पीसी, टॅब्लेट आणि डिजिटल प्रकाशन या क्षेत्रात २१व्या शतकाच्या आरंभी क्रांती घडवणारा उद्योजक 'स्टीव्ह जॉब्स' एकेठिकाणी म्हणाला होता, 'इतरांच्या मतांच्या गोंगाटात आपल्या अंतर्गत आवाजाला विसरू नका. स्वत:चे अंत:करण आणि अंत:प्रेरणा यांचा पाठपुरावा करण्याचे धैर्य मिळवा. आपण खरोखर काय बनू इच्छित आहात हे आपल्या मनाला आधीच माहीत असते, बाकी सर्व काही गौण आहे.' तेव्हा अशाच विचाराने प्रेरित आणि प्रयत्नशील- मकरंद उत्पात याला त्याच्या यापुढील सर्व स्वप्नपूर्तीसाठी शुभेच्छा!

***

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408

बी. एम. एम. च्या **ग्रँड रॅपिड्स** येथील अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाची ब्लू रे डिव्हिडी आता उपलब्ध किंमत १० डॉलर्स (शिपिंगसह) ऑर्डर करण्यास ई मेल पाठवा अथवा फोन करा.

BMM of North America
Tel: 267-981-5170
email: brihanmm@gmail.com
Web: www.bmmonline.org

पुण्यातील चितळे बंधू उद्योगाचे बाकरवडी, आंबा बर्फी, बटाट्याचा चिवडा आणि नारळाची वडी हे पदार्थ आता आमच्याकडे मिळतात. त्याशिवाय इतर सर्व मराठी खाद्यपदार्थांसाठी (सर्व प्रकारचे लाडू, करंजी, पातळ पोह्यांचा चिवडा, चकली, अनरसे, चिरोटे, शंकरपाळे, चटण्या, मसाले, पापड, कुरडया, सुपारी, गूळ आणि पुरण पोळी, थालिपीठ भाजणी,) यासाठी आमची वेबसाईट पहा.

Neelam Audio & Video, Inc.
Tel: 215-354-1423,
email: neelamvdo@gmail.com
Web: www.neelam.com